३० MAR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर







१) कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभात महेश बंडगर यास राष्ट्रपती व सोहम जगताप यास कुलपती सुवर्णपदक प्रदान करताना प्रा. संजय धांडे, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव. २) शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा भवन क्र. २ च्या प्रांगणात पदवी घेण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परीक्षा विभागाच्या स्टॉलवर केलेली गर्दी. ३) परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी विद्यापीठाची ५९ वी दीक्षान्त मिरवणूक काढण्यात आली. (छाया : पांडुरंग पाटील)

# पदवी, सेल्फी आणि आनंद

## विद्यार्थ्यांच्या उत्साहाने भारला विद्यापीठ कॅम्पस

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उच्च शिक्षणाच्या पदवीकडे कौतुकाने पाहणारी नजर, अभिनंदनाचे फुलोरे, कॉलेज, विद्यापीठात एकत्र केलेल्या अभ्यासाच्या आठवणी, सेल्फी आणि ग्रुप फोटोतून क्लिक होणारे क्षण, भविष्यातील करिअरच्या गप्पा अशा उत्साही वातावरणाने शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पस गजबजून गेला. शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने पदवीधर स्नातकांनी शैक्षणिक वळणावरचा महत्त्वाचा टप्पा गाठल्याचा आनंद साजरा केला.

कोरोनामुळे दोन वर्षे विद्यार्थ्यांनी त्यांच्या कॉलेजमध्येच पदवी प्रमाणपत्र स्वीकारले; मात्र यंदा विद्यापीठाच्या आवारात येऊन पदवी प्रमाणपत्र घेणे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पार्श्वभूमीवर फोटो काढणे, दीक्षांत सोहळ्याचा साक्षीदार होणे हा माहोल अनुभवण्याची पर्वणी विद्यार्थ्यांना आली. यंदाच्या दीक्षांत सोहळ्यात पीएच.डी.धारक स्नातक, पारितोषिकप्राप्त विद्यार्थी, तसेच सुवर्णपदकाचे मानकरी ठरलेले विद्यार्थी यांना व्यासपीठावर पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या विद्यार्थ्यांवर सभामंडपात त्यांचे शिक्षक, कुटुंबीय, मित्र परिवार यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव सुरू होता.

सकाळी १० वाजल्यापासूनच विद्यापीठाच्या आवारात विद्यार्थ्यांची गर्दी सुरू झाली. विद्यापीठाच्या सर्व प्रवेशद्वाराबाहेर वाहने पार्क करून विद्यार्थी गटागटाने कॅम्पसमध्ये आले. युको बँकेच्या चौकापासून विद्यापीठाच्या मुख्य गेटपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा वाहनांची गर्दी झाली होती. कोल्हापूर जिल्ह्यासह सांगली, सातारा, कोकण, सोलापूर येथील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी कॅम्पस अक्षरशः फुलून गेला. मुख्य सोहळा सुरू होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांनी बुथवरून पदवी प्रमाणपत्र स्वीकारले आणि त्यांचे जल्लोषात फोटो सेशन सुरू झाले. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील हिरवळीवर विद्यार्थी पदवी प्रमाणपत्रासोबतचा क्षण कॅमेऱ्यात कैद करत होते. फोटो क्लिक होताच तो सोशल मीडियावर पोस्ट केला जात होता. रिल्स, व्हिडीओ बनवून ते शेअर केले जात होते.



शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभानिमित्त पदवीसमवेत छायाचित्रे काढून घेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज वर्तुळ उद्यानामध्ये जमलेल्या विद्यार्थिनींचा उत्साह असा ओसंडून वाहत होता. (छाया : पांडुरंग पाटील)

### कलर थिम आणि ड्रेसकोड

गेल्या वर्षी ज्यांचे शिक्षण पूर्ण झाले, ते एक वर्षानंतर विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये भेटणार असल्याने त्यांना खूपच उत्सुकता होती. त्यासाठी खास प्लॅनिंग केल्याचेही दिसून येत होते. अनेक मुलींनी पांढरा टॉप आणि लाल सलवार अशी थिम केली होती, तर कॉम्प्युटर इंजिनिअरिंगची पदवी घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या एका ग्रुपने ब्ल्यू जिन्स आणि ब्लॅक शर्ट असा ड्रेसकोड केला होता. काही मुलींनी ट्विन्स ड्रेस थिम करत एकसारखे ड्रेसअप करून फोटो काढले.

### बुथवर योग्य नियोजन

पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यासाठी मुख्य सभामंडपासमोर बुथ मांडण्यात आले होते. या ठिकाणी विद्याशाखांनुसार पदवी प्रमाणपत्रे देण्याची सुविधा करण्यात आली होती. योग्य नियोजनामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र सुरळीतपणे दिले जात होते. पदवी प्रमाणपत्रात काही चूक असेल तर ती ऑनलाईन दुरुस्त करण्याची यंत्रणा ठेवण्यात आली होती.

### ग्रंथ प्रदर्शन आणि फूड स्टॉलला प्रतिसाद

दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या ग्रंथ प्रदर्शन व फूड स्टॉलला प्रतिसाद मिळाला. यंदा तृणधान्य वर्ष असल्याने फूड स्टॉलवरील तृणधान्यांपासून बनवलेल्या पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी गर्दी झाली. पुस्तकांची खरेदी करण्यासाठी अनेकांनी ग्रंथ प्रदर्शनातील स्टॉलला भेट दिली.

30 MAR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी 'लाईफ लाँग लर्नर' राहावे : प्रा. संजय धांडे

## विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभास नवस्नातकांची उत्साही उपस्थिती

कोल्हापूर : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी 'लाईफ लाँग लर्नर' अर्थात आयुष्यभर शिकण्याच्या प्रक्रियेत व्यस्त राहावे आणि काळानुरूप आवश्यक कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन आय.आय.टी कानपूरचे माजी संचालक प्रा. संजय धांडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती रमेश बैस होते. समारंभात ते ऑनलाईन सहभागी झाले होते.

प्रा. धांडे म्हणाले, जीवनाच्या या विद्यापीठात कोणती परीक्षा नाही की गुण नाहीत, प्रमाणपत्र नाही की लेक्चर्स आणि प्रॅक्टिकलही नाहीत; मात्र या विद्यापीठातील सर्व विद्यार्थी अनुभवातून शिकत आहेत. आजचे जग हे फार गतीने बदलत आहे. कोविडनंतर तर या बदलांचा वेग अधिकच वाढला आहे. बदलत्या परिस्थितीत काही कौशल्ये कालबाह्य होत आहेत, तर काही नवी कौशल्ये उदयास येत आहेत. या कौशल्यांना प्रचंड मागणी आहे. त्यामुळे आज एखाद्याने स्वतःहून नवीन कौशल्य आत्मसात करणे हेच खरे शिक्षण आहे.

अनुभव हा महान शिक्षक आहे. तुम्ही आता या लाईफ लाँग लर्निंग युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी असाल आणि तुमचा शिक्षक म्हणून अनुभव घ्याल. या विद्यापीठात पदवी नाही. तुम्ही आयुष्यभर विद्यार्थी राहाल.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलताना प्रा. संजय धांडे, व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

(छाया : पांडुरंग पाटील)

अध्यक्षीय मनोगतामध्ये राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी सुरुवातीलाच आई अंबाबाईच्या पावन भूमीला आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करत भाषणास प्रारंभ केला. बैस म्हणाले, करवीरनगरी ही भारतातील लोकांसाठी दक्षिण काशी आहे. माता अंबाबाईचे हे पवित्र मंदिर भाविकांचे पवित्र निवासस्थान आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे हे राज्य पुरोगामी आणि कल्याणकारी कार्यांसाठी देशभर प्रसिद्ध आहे. या वर्षी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाने विविध उपक्रम आयोजित केल्याबद्दल समाधान वाटले. विद्यापीठाने राजर्षी शाहूंचे स्मारक संग्रहालय उभारण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास्पद आहे. हे संग्रहालय सर्वांसाठी खुले असावे, जेणेकरून लोकांना राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्याची माहिती होऊन प्रेरणा घेता येईल. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील अनेक कुटुंबांमध्ये पहिले पदवीधर घडवून विद्यापीठाने राज्याच्या सामाजिक, आर्थिक विकासात मोठे योगदान दिले आहे.

### राज्यपालांकडून कौतुक

पदवीदान कार्यक्रमामध्ये एकूण ६४ स्नातकांमध्ये अवघे १५ विद्यार्थी व बाकीच्या विद्यार्थिनी होत्या. ही बाब कुलपती बैस यांना प्रकर्षाने जाणवली. याचा उल्लेख करत विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देऊन महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ करत असलेले काम कौतुकास्पद आहे, असे उद्गार त्यांनी काढले.

यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला. यामध्ये त्यांनी गेल्या वर्षभरातील विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधकीय प्रगतीसह वर्षभरातील महत्त्वाच्या निर्णयांचा व राबवलेल्या विद्यार्थीभिमुख उपक्रमांचा आढावा घेतला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महेश बंडगर याला राष्ट्रपती सुवर्णपदक आणि सोहम तुकाराम जगताप याला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे अन्य ६२ स्नातकांना मंचावर पदव्या प्रदान करण्यात आल्या. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील आणि सुस्मिता खुटाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनापासून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्या नेतृत्वाखाली दीक्षांत मिरवणुकीस दुपारी पावणेबारा वाजता प्रारंभ झाला.

3 0 MAR 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दोन वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठाचा परिसर फुलला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कुणी सेल्फी घेण्यात, तर कुणी हातात पदवी प्रमाणपत्र घेऊन स्माइल प्लीजची पोझ देण्यात मग्न होते. सोबत पालकही आपल्या पाल्याच्या आनंदात सहभागी होत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचा आनंद मात्र ओसंडून वाहत होता. तब्बल दोन वर्षानंतर शिवाजी विद्यापीठाचा परिसर हजारो विद्यार्थ्यांच्या आनंदात बुधवारी न्हाऊन निघाला. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाचे.

या समारंभात प्रमाणपत्र स्वीकारणे ही स्नातकांसाठी आनंदाची पर्वणी असते. मात्र, कोरोनामुळे सलग दोन वर्षे हा समारंभ ऑनलाइन केला होता. यंदा मात्र, राजमाता जिजाऊ सभागृहात ऑफलाइन पद्धतीने हा सोहळा झाला. सकाळी साडेसात वाजल्यापासून कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील स्नातकांनी प्रमाणपत्र घेण्यासाठी विद्यापीठात गर्दी केली.

### प्रमाणपत्र देण्यासाठी ४२ स्टॉल

विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यासाठी परीक्षा भवन आवारात ४२ स्टॉल उभारले होते. प्रत्येक स्टॉलवर कॉन्व्होकेशन आणि स्नातकांना पदवी प्रमाणपत्र नंबरची माहिती दिली होती. स्नातकांच्या मोबाइलवर दोन दिवस आधीच त्यांच्या क्रमांकाचे एसएमएस दिल्याने प्रमाणपत्र घेताना केवळ आधार किंवा तत्सम आयडी प्रूफ दाखवले की प्रमाणपत्र मिळत होते. सकाळी साडेसात वाजल्यापासून अकरा वाजेपर्यंत ही गर्दी कायम होती. समारंभानंतर दुपारी दोनपासून सायंकाळी सहापर्यंत या स्टॉलवरून प्रमाणपत्रे देण्यात येत होती.

### छत्रपतींच्या पुतळ्याभोवती गलका

पदवीचे प्रमाणपत्र हातात मिळाल्यानंतर स्नातक शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याभोवती छायाचित्र काढण्यासाठी गर्दी करीत होते. विशेष म्हणजे सकाळी साडेसातपासून सायंकाळपर्यंत ही गर्दी कायम होती.

लोकमत

# लेकीसह आईने घेतली पदवी

पदवीदान सोहळ्यात छायाचित्रे काढण्यासाठी बुधवारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ अनेक विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. या गर्दीत आईसोबत पदवी घेतलेल्या विद्यार्थिनीचाही समावेश होता. दोघींच्याही हातात प्रमाणपत्र घेतलेली छायाचित्रे काढताना वडिलांचा आनंद गगनात मावत नव्हता.

लोकमत

# प्रत्यक्ष १६ हजार ५९४ स्नातकांनी घेतली पदवी

यंदा ६६,४५७ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी १६,५९४ स्नातकांनी या दिवशी प्रत्यक्ष पदवी घेतली. परीक्षा विभागाने एकूण ४३ स्टॉलच्या माध्यमातून व्यवस्था केली होती. कोविडनंतर दोन वर्षांनी प्रथमच प्रत्यक्षात झालेल्या या दीक्षांत समारंभात पदवी घेण्यासाठी १५ हजारांवर तरुणाई उपस्थित होती. पदवी घेण्यासाठी, छायाचित्रे काढून घेण्यासाठी आणि जुन्या मित्र-मैत्रिणींना भेटण्यासाठी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याभोवती विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

30 MAR 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

A32

# नवीन कौशल्ये आत्मसात करणे हेच खरे शिक्षण

## संजय धांडे : शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ उत्साहात; विद्यापीठाने संशोधनात प्रभुत्व मिळवावे : राज्यपाल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यापीठांनी मुक्त बहुशाखीय अभ्यासक्रमांची कास धरावी, असा आग्रह धरत कानपूर आयआयटीचे माजी संचालक प्रा. संजय धांडे यांनी बुधवारी विद्यार्थ्यांनी 'लाइफ लाँग लर्नर' प्रक्रियेत राहत नवीन कौशल्ये आत्मसात करणे, हेच खरे शिक्षण आहे असे आवाहन केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलपती राज्यपाल रमेश बैस ऑनलाइन सहभागी झाले. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव तसेच अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेचे सदस्य उपस्थित होते. राज्यपाल बैस यांनी विद्यापीठाने संशोधनामध्येही प्रभुत्व मिळवावे असे आवाहन केले.

प्रा. धांडे म्हणाले, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम अवलंबित असताना विद्यार्थ्यांना त्यांच्या विषय निवडीचे स्वातंत्र्य द्यायला हवे. निम्न स्तरावरील शिक्षणानेही व्यापक, मूल्याधारित शिक्षणाचा पाया प्रदान केला पाहिजे. तंत्रज्ञान बदलते आणि उच्च शिक्षणात घेतलेले चार वर्षांचे शिक्षण कमी पडते. म्हणून बहुविद्याशाखीय अभ्यासाची सवय लावून घेत निरंतर शिकवत रहावे.

या विद्यापीठात कोणती परीक्षा नाही की गुण नाहीत, प्रमाणपत्र नाही की लेक्चर्स आणि प्रॅक्टिकलही नाहीत. मात्र, येथील सर्व विद्यार्थी अनुभवातून शिकत आहेत. जग कोविडनंतर वेगाने बदलले आहे. यात नवीन कौशल्य आत्मसात करणे, हेच खरे शिक्षण आहे, असे सांगून धांडे यांनी मानवी मूल्ये, प्रश्नोत्तर संवाद, निरीक्षण या घटकांवर भर देण्यास सांगितले. लाइफ लाँग लर्निंग युनिव्हर्सिटीत पदवी नाही. तुम्ही आयुष्यभर विद्यार्थी रहाल, यामुळे जीवन समृद्ध राहील. विचलित करणारे, अनेक मोहमयी, पण धोकादायक मार्ग खुणावतील; पण सचोटी व प्रामाणिकपणा यावर ठाम रहा, असा आग्रह धांडे यांनी धरला.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीस प्रारंभ केल्याचे सांगत वार्षिक अहवाल सादर केला. नॅशनल अकॅडमिक डिपॉझिटरी कक्षाद्वारे २००२ ते २०२१ या काळातील (३८ वा ते ५७ वा दीक्षांत समारंभ) पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची ७,४०,८५० प्रमाणपत्रे डिजिलॉकरमध्ये अपलोड केल्याचे, तसेच अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटसाठी पोर्टलवर एकूण ९८ टक्के विद्यार्थ्यांनी नोंदणी केल्याचे सांगितले.

डॉ. धांडे यांच्या हस्ते महेश माणिक बंडगर यास राष्ट्रपती सुवर्णपदक व सोहम तुकाराम जगताप यास कुलपती सुवर्णपदक दिले. ६२ स्नातकांना पदवी प्रदान केली. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील व सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, मुख्य इमारतीपासून डॉ. अजितसिंह जाधव यांच्या नेतृत्वाखाली दीक्षांत मिरवणूक काढली. यात उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील सहभागी झाले होते. डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख व डॉ. मेघा गुळवणी यांनी त्यांच्या विद्याशाखेच्या स्नातकांना सादर केले व कुलपतींनी त्यांना पदवी अनुग्रह करण्यास मान्यता दिली.



दीक्षांत समारंभात डॉ. संजय धांडे यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या व तिसऱ्या छायाचित्रात डॉ. संजय धांडे यांच्या हस्ते महेश बंडगर याने राष्ट्रपती सुवर्णपदक, तर सोहम जगताप याने कुलपती सुवर्णपदक स्वीकारले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, आदी उपस्थित होते.

## प्रत्यक्ष उपस्थित राहता न आल्याची खंत : रमेश बैस



कुलपती रमेश बैस यांनी अध्यक्षीय भाषणात प्रत्यक्ष उपस्थित राहता न आल्याबद्दल खंत व्यक्त केली. कुलपतीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर पहिल्याच दीक्षांत समारंभाला हजेरी लावत असल्याचे सांगून बैस यांनी करवीरनगरी, अंबाबाई, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांविषयी आदर व्यक्त केला. शाहू महाराज स्मृती शताब्दीनिमित्त विविध उपक्रम, तसेच शाहूंचे स्मारक संग्रहालय उभारण्याचा विद्यापीठाचा निर्णय कौतुकास्पद असल्याचे सांगत ते सर्वांसाठी खुले करण्यास सांगितले.

### राज्यपालांनी केले विद्यापीठाचे कौतुक

राज्यपाल बैस यांनी भाषणात, यूजीसीच्या प्रथम श्रेणीमध्ये स्थान, आयएसओ प्रमाणपत्र, तसेच एनआयआरएफ व क्यूएस रँकिंगमधील स्थान वाढल्याबद्दल, तसेच उद्योग-व्यवसायातील स्टार्ट-अप, ऊस लागवड आणि त्यावर आधारित उत्पादने, गूळविषयक संशोधनासाठी विद्यापीठाचे कौतुक केले. २५ वर्षांच्या वाटचालीचा आराखडा तयार करावा, संशोधनाला चालना देत राहून सर्वच क्षेत्रांत पेटंट मिळविण्याचा प्रयत्न करावा, क्रीडा विकासाचा कार्यक्रम तयार करावा, असे आवाहनही त्यांनी विद्यापीठाला केले.

30 MAR 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत





कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभात पदवी घेतलेल्या विद्यार्थिनींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसरात विविध पोझमध्ये छायाचित्रे काढून घेण्यासाठी जमल्या होत्या. (सर्व छाया : आदित्य वेल्हाळ)



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसरात हातात पदवी घेतलेल्या विद्यार्थिनींचे एकत्रित टिपलेले हे छायाचित्र.



पदवीधारक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी जिजाऊ सभागृहाच्या बाजूला उभ्या केलेल्या स्टॉलमधून प्रमाणपत्र घेण्यासाठी गर्दी केली होती.

30 MAR 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : पदवीचा आनंद साजरा करताना विद्यार्थिनींचा एक ग्रुप.

# रणरणत्या उन्हातही सळसळता उत्साह

## तीन वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठात दीक्षांत सोहळा : आनंद सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग



कोल्हापूर : परीक्षा भवनसमोर काऊंटरवर विद्यार्थ्यांना दिलेल्या क्रमांकानुसार पदवी प्रमाणपत्रांचे वितरण सुरू होते.



पदवीसोबत सेल्फी घेताना विद्यार्थी. (सर्व छाया : पप्पू अत्तार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पदवी प्रमाणपत्र हातात घेऊन शिवाजी विद्यापीठासमोरील प्रांगणात फोटो काढण्याचा मोह नाही झाला तर नवलच. तीन वर्षांनी पुन्हा विद्यापीठात झालेल्या दीक्षांत सोहळ्यात तरुणाईचा सळसळता उत्साह दिसून आला. अनेकांनी सहकुटुंब या सोहळ्यात सहभाग नोंदवला.

शिवाजी विद्यापीठातच पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याने तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. परीक्षा भवनसमोरच ४२ काऊंटर मांडण्यात आले होते. सकाळी ७.३० वाजल्यापासून येथे पदवी प्रमाणपत्रांचे वितरण सुरू होते.

**फोटोसेशनला तोबा गर्दी**

पदवी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मुख्य इमारती समोरील बगीचा, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर फोटो घेण्यासाठी मोठी गर्दी पाहायला मिळाली.

**सेल्फी आणि सोशल मीडियावर धूम**

प्रमाणपत्र हातात घेऊन जो तो सेल्फी घेत होता. तसेच मित्र-मैत्रिणींच्या घोळक्याचा सेल्फी घेऊन तो सोशल मीडियावर अपलोड केला जात होता. अनेकजण आई-वडील, कुटुंबातील सदस्यांसोबत स्वत:चे फोटो घेताना दिसून आले. मित्रपरिवारासोबत फोटो घेण्याचा मोह अनेकांना आवरला नाही.

**सहकुटुंब सोहळा**

अनेकजण पदवी घेण्यासाठी कुटुंबासोबत आले होते. कडेवर चिमुकल्याला घेऊन पदवी घेणारी विवाहिता... नातवाला पदवी मिळाल्याचा सोहळा पाहण्यासाठी आलेली आजी... मुलीचे कौतुक करण्यासाठी आलेले आई-बाबा... आईने घेतलेल्या पदवीचा आनंद सोहळा पाहण्यासाठी आलेली मुले असे अनेक क्षण या पदवीप्रदान सोहळ्यानिमित्त नजरेस पडत होते.

30 MAR 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक धोरणाची २५ वर्षांची ब्ल्यू प्रिंट तयार करा

## शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभात कुलपती रमेश बैस यांचे आवाहन



कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थ्यांचे चरित्र निर्माण, बुद्धीचा विकास व स्वत:च्या पायावर उभे करण्यास हातभार लावणारे शिक्षण स्वामी विवेकानंद यांना अभिप्रेत होते. हेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. नवीन शैक्षणिक धोरण सर्व विद्यापीठांमध्ये लागू झाल्यानंतर ऐतिहासिक बदल होईल. विद्यापीठांनी पुढील २५ वर्षांची शैक्षणिक धोरणाची ब्ल्यू प्रिंट तयार करून देश निर्माण कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी केले.

विद्यार्थ्यांनी 'लाईफ लाँग लर्नर' अर्थात आयुष्यभर शिकण्याच्या प्रक्रियेत व्यस्त राहावे. कालानुरूप आवश्यक कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) कानपूरचे माजी संचालक प्रो. डॉ. संजय धांडे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले.

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ केंद्रीय पद्धतीने बुधवारी राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झाला. यावेळी राज्यपाल ऑनलाईन पद्धतीने अध्यक्षस्थानावरून बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रपतींचे सुवर्णपदक महेश बंडगर व कुलपती सुवर्णपदक सोहम जगताप यांना पान ५ वर

# शैक्षणिक धोरणाची २५ वर्षांची ब्ल्यू प्रिंट तयार करा

(पान १ वरून) प्रदान करण्यात आले. १६ पारितोषिके व ४० पीएच.डी. पदव्या देण्यात आल्या. राज्यपाल बैस म्हणाले, कोल्हापूर अंबाबाईचे पवित्र स्थान व राजर्षी शाहू महाराज यांचे संस्थान प्रगती व समाजहित कार्यासाठी देशात प्रसिद्ध आहे. राजर्षी शाहू स्मृती शताब्दी वर्षात शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी सुरू केलेले संग्रहालय कौतुकास्पद आहे. या संग्रहापासून नवीन पिढीला प्रेरणा मिळेल. शिक्षित लोकांना प्रशिक्षण दिल्यास ते क्रांतिकारी परिवर्तन करू शकतात. दीक्षांत समारंभात दिलेल्या पारितोषिक व पदव्यांमध्ये मुलापेक्षा मुलींची संख्या जास्त आहे. शिवाजी विद्यापीठ स्त्री सबलीकरणासाठी घेत असलेल्या परिश्रमाबद्दल राज्यपालांनी कौतुक केले.

प्रो. धांडे म्हणाले, कोरोनानंतर बदलाचा वेग वाढला आहे. काही कौशल्ये कालबाह्य होत असून, नवी कौशल्ये उदयास येत आहेत. त्यामुळे नवीन कौशल्ये आत्मसात करणे खरे शिक्षण आहे. अनुभव जीवनातील महत्त्वाचा शिक्षक आहे. तुम्ही लाईफ लाँग लर्निंग युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी म्हणून अनुभव घेणार आहात. शिक्षण हे पूल मॉडेल असून, पूश मॉडेल नव्हे. प्रश्नोत्तर संवाद हाच शिक्षणाचा पाया असून, त्यात सातत्य राहिले तरच त्यांचे कौशल्यात रूपांतर होईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा




कोल्हापूर : दीक्षांत समारंभात राष्ट्रपती सुवर्णपदक महेश बंडगर व कुलपती सुवर्णपदक सोहम जगताप यांना प्रदान करताना प्रो. डॉ. संजय धांडे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव. (छाया : पप्पू अत्तार)

दीक्षांत समारंभाच्या भव्य मंडपात विद्यापीठाकडून डी.लिट. पदवी दिलेल्या मान्यवरांची माहिती सचित्र लावली होती. यात दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्यासह महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, साहित्यिक वि. स. खांडेकर, भाई माधवराव बागल, जी. डी. बापू लाड यांचा समावेश होता. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनातर्फे डॉ. शिवाजी जाधव लिखित 'स्वतंत्रमतवादी साप्ताहिक लेखक पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या अग्रलेखांचा संग्रह' या पुस्तकाचे प्रकाशन केल्याचे कुलगुरूंनी भाषणात सांगितले.

30 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सूर वाद्यांचा, मिलाफ संस्कृतीचा

## पाश्चिमात्य, दाक्षिणात्य वाद्यांचे एकत्रित बहारदार सादरीकरण



**कोल्हापूर :** पाश्चिमात्य व दाक्षिणात्य वाद्य यांचा मिलाप साधणाऱ्या वेगवेगळ्या वाद्याचे सादरीकरण विद्यापीठात बुधवारी एकाच व्यासपीठावर रंगले.

कोल्हापूर, ता. २९ : पाश्चिमात्य आणि दाक्षिणात्य वाद्य यांचा मिलाफ साधणारे दुर्मिळ आणि पारंपरिक वेगवेगळया वाद्यांचे सादरीकरण शिवाजी विद्यापीठात एकाच व्यासपीठावर आज रंगले. त्यातून संस्कृतीचे दर्शन घडले.

विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात 'जागर दुर्मिळ वाद्यांचा व भावतरंग' सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. त्यामध्ये ढोलकी, पखवाज, दिमडी, हलगी, धनगरी ढोल, संबळ या महाराष्ट्रीयन वाद्यांद्वारे लावणी, वाघ्या मुरळी, गोंधळ, नमन, दशावतार, गण-गवळण, पोवाडा यांचे बहारदार सादरीकरण केले. थविल, मुरासु, ठडुम्मई, इडम्मा, इदालम, मोडा मेलम, कोट्टू मेलम, मृदंगम, गंजिरा, सिंगारी मेलम, थप्पू, पराई, पंवई ईसाई या दाक्षिणात्य वाद्यांद्वारे हरिनाम संकिर्तन, सलंगाई मेलम, देवी श्लोक, गणेश स्तुती यांचे सादरीकरण संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी ऋषिकेश देशमाने आणि त्यांच्या साथीदारांनी केले. या कार्यक्रमास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पोवार, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, संगीत अधिविभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, विनोद ठाकुर-देसाई, निखिल भगत, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर आदी उपस्थित होते.

**मंत्रमुग्ध करणारा 'भावतरंग'**

लोकगीत, भावगीत, सिनेगीत, भक्तीगीत, प्रेमगीत, लावणी, द्वंदगीत यांचा बहारदार आणि मंत्रमुग्ध करणारा 'भावतरंग' कार्यक्रम संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले.

सकाळ

# 'मूटकोर्ट'मुळे सक्षम विद्यार्थी घडण्यास मदत : डॉ. महाजन

## शिवाजी विद्यापीठात स्पर्धा उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : कायद्याची पदवी घेतल्यानंतर लवकर सक्षम होण्यासाठी मूटकोर्ट स्पर्धा उपक्रमात सहभाग घेणे महत्त्वाचे आहे. केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून कोर्टात युक्तिवाद कसा करावा याचा प्रत्यक्ष अनुभव मूटकोर्टद्वारे विद्यार्थ्यांना मिळते, असे प्रतिपादन वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील विधि विभागातर्फे आयोजित मूटकोर्ट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश सुनील कोतवाल यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठ विधि विभागप्रमुख डॉ. विवेक धूपदाळे म्हणाले, "कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कोर्टात कसा युक्तिवाद करावा याचा प्रत्यक्ष अनुभव मिळणे महत्त्वाचे असते. यासाठी विधी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले." निवृत्त न्यायाधीश सुनील कोतवाल म्हणाले, "विधी पदवीधर आणि युवा वकिलांनी आयुष्यात यशस्वी वकील व्हायचे असल्यास केवळ कायद्याचे ज्ञान घेऊन उपयोग नाही. त्यांनी सभोवतालच्या घडामोडींकडे लक्ष ठेवून चौफेर ज्ञान बाळगणे गरजेचे आहे."

या कार्यक्रमास जिल्हा बार असोसिएशन अध्यक्ष गिरीश खडके, शहाजी लॉ कॉलेजचे निवृत्त प्राचार्य आर. नारायण, सूर्यकांत मिरजे, प्रा. राजशेखर मलूष्टे, राजेंद्र पाटील, चंद्रकांत कुरणे, ऋता निंबाळकर, हेमा जाधव, तेजस्विनी कासे, औदुंबर बनसोडे, देवदास चौगुले, अरविंद पाटील, प्रियांका गुरव, राम गोपलाने, नागेश दरेकर, आदी उपस्थित होते. दरम्यान, निवृत्त न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी यांनी वकिलांची कर्तव्य न्यायालयीन अधिकार विधी शिक्षणानंतरच्या संधी, न्यायाधीश परीक्षेसाठी कशाप्रकारे अभ्यास करावा याची माहिती दिली. बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे उपाध्यक्ष विवेक घाटगे यांनी कार्य आणि जबाबदारी याची माहिती दिली. मानसी क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचे संयोजन माधवी माळगे, प्रमोद दाभाडे यांनी केले.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विधि विभागातर्फे आयोजित मूटकोर्ट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी मार्गदर्शन केले. या वेळी आर. नारायण, गिरीश खडके, सुनील कोतवाल, विवेक धूपदाळे, राजेंद्र पाटील उपस्थित होते.

30 MAR 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दीक्षान्त समारंभ; सेल्फी, लक्षवेधी पोशाख अन् गप्पांचा फड

# नवपदवीधरांचा जल्लोष...

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : जीवनातील एक शैक्षणिक टप्पा यशस्वी पूर्ण केल्याचा आनंद नवपदवीधरांनी जल्लोष करून साजरा केला. दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने ही मंडळी विद्यापीठ परिसरात जमली होती. इथे त्यांनी एकमेकांशी गप्पा मारण्याचा मनमुराद आनंद लुटला. सेल्फीच्या माध्यमातून हे आनंदी क्षण त्यांनी साठवून ठेवले. काही विभागांच्या विद्यार्थ्यांनी एकसारखी वेशभूषा केली होती. त्यांच्या कपड्यांच्या रंगसंगतीने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.

विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ आज झाला. या निमित्ताने विद्यापीठाच्या आवारात सकाळी दहापासूनच विद्यार्थी आणि विद्यार्थिनी येत होते. बरेच दिवसांनी एकमेकांना भेटणाऱ्या सवंगड्यांनी हा दिवस आनंदात घालविला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पार्श्वभूमीवर छायाचित्रे काढणे, दीक्षान्त सोहळ्याचा साक्षीदार होणे हा माहोल अनुभवण्याची पर्वणी विद्यार्थ्यांनी घेतली.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षान्त समारंभ बुधवारी उत्साहात झाला. दोन वर्षांनी ऑफलाइन स्वरूपात केंद्रीय पद्धतीने यंदा समारंभ झाला. त्यात पदवी घेतलेल्या विद्यार्थिनींनी अशा प्रकारे आनंद व्यक्त केला.
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

> विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ हा प्रत्येक पदवीधराच्या जीवनातील एक संस्मरणीय क्षण असतो. तब्बल दोन वर्षांनी हा सोहळा झाला. त्यामुळे आम्ही सर्व पदवीधरांच्या मनात एका प्रकारचा उत्साह होता.
>
> **- श्रद्धा मोहिते**

### पुस्तकांच्या स्टॉलला प्रतिसाद

राजमाता जिजाऊ साहेब सभागृहासमोर विविध प्रकारचे स्टॉल उभारले होते. इथे पुस्तकांचेही स्टॉल होते. वाचन कट्टा या उपक्रमाचाही पुस्तकांचा स्टॉल होता. तृणधान्यांपासून बनवलेले विविध पदार्थ येथे विक्रीसाठी उपलब्ध होते. दिव्यांग व्यक्तींनी बनवलेल्या वस्तू येथे विक्रीसाठी ठेवल्या होत्या. याला प्रतिसाद लाभला.

### ऑनलाइन उपस्थिती

दीक्षान्त समारंभाचे प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठाच्या शिव-वार्ता यूट्यूब वाहिनीवरून थेट प्रसारित करण्यात आले होते. याचा लाभ देश-विदेशातील विद्यार्थ्यांनी आणि आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांनी घेतला. सुमारे दीड हजारहून अधिक स्नातक कार्यक्रमात सहभागी झाले.

### दीक्षान्त मिरवणुकीचे आकर्षण

दीक्षान्त सोहळ्यात दीक्षान्त मिरवणूक महत्त्वाची असते. यात परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी ज्ञानदंड हाती घेतला होता. विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राध्यापक, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य या मिरवणुकीत निश्चित वेशभूषेत सहभागी झाले होते.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त बुधवारी पदवीसमवेत छायाचित्रे काढून घेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात विद्यार्थिनींनी केलेली गर्दी.

3 0 MAR 2023 सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षान्त समारंभात बुधवारी विद्यार्थी महेश बंडगर याला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक कुलपतींचे सुवर्णपदक सोहम जगताप याला देताना डॉ. संजय धांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी (डावीकडून) डॉ. विलास शिंदे, डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदी.
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

# एकलव्य होऊन नवी कौशल्ये शिका



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षान्त समारंभात बुधवारी राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले.

## डॉ. धांडे म्हणाले....

- मानवी मूल्ये, नैतिकतेचा पाया हा जीवनाचा मूलभूत घटक
- विद्यार्थ्यांनी सचोटी, आर्थिक प्रामाणिकपणा आत्मसात करणे आवश्यक
- शिक्षण हे पूल मॉडेल आहे, पुश मॉडेल नव्हे
- तरुणांमध्ये ज्ञानाची भूक असते. समाजाने त्यासाठी साह्यभूत व्हायला हवे
- मार्केटचा रेटा जिकडे, त्या शाखेकडे जाण्याची प्रवृत्ती कमी होण्याची गरज

## गुणवंतांचा पारितोषिकाने गौरव

या समारंभात १६ स्नातकांना पारितोषिकाने गौरविण्यात आले. ४६ जणांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यात प्रतीक्षा गव्हाणे, मीनल जाधव, वेदिका कुलकर्णी, सरस्वती कदम, जाकिया मुजावर, प्राजक्ता पाटील, तेजस यादव, तब्बू शेख, वैभव वरुटे, शीतल गुजर, रामचंद्र आळवेकर, हेमांगी दमामे, अखिलेश पाटील, विनायक गायकवाड, अश्विनी माळी, अभिजित कोसंबी, स्नेहल जगताप आदींचा समावेश होता.

>> पान १ वरून

बदलांचा वेग वाढला आहे. त्यात कौशल्यांना मोठी मागणी आहे. एकलव्याप्रमाणे नवी कौशल्य आत्मसात करणे, हेच खरे शिक्षण ठरणार आहे. त्यादृष्टीने पदवीधरांनी कौशल्य शिकण्याची आणि आत्मसात करण्याची भूक, उत्कट निरीक्षणे, प्रश्नोत्तरे- संवाद, कुतूहल, सराव, शिस्त या पैलूंद्वारे नव्या युगातील डिजिटल एकलव्य व्हावे. थ्री-एल युनिव्हर्सिटीतील अनुभव या शिक्षकाच्या माध्यमातून आयुष्यभर शिक्षण घेऊन समृद्ध जीवनाच्या दिशेने वाटचाल करावी.''

राज्यपाल बैस म्हणाले, ''ज्ञान हे धन आहे. ते जेवढे खर्च कराल, तेवढे वाढते. ज्ञानाच्या माध्यमातून चारित्र्य घडते. शिक्षण परिवर्तनाचे मोठे साधन आहे. त्यामुळे निरंतर शिक्षण घेणारे विद्यार्थी व्हा. नवीन शैक्षणिक धोरणाची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणीवर विद्यापीठांनी भर द्यावा. काही विभागांना सेंटर ऑफ एक्सलन्स करावे. एनआयआरएफ रँकिंग वाढवावे. राष्ट्रनिर्माण कार्यात विद्यापीठ, विद्यार्थ्यांनी योगदान द्यावे.''

यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल मांडला. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांनी विद्यापीठाला सहकार्य करावे. विद्यापीठाची गुणवत्ता, दर्जा सातत्याने वाढविण्याचा निर्धार आपण सर्वांनी करूया, असे आवाहन त्यांनी केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी विविध पदवी अभ्यासक्रमांची माहिती दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, विविध विभागांचे अधिष्ठाता, अधिकार मंडळांचे सदस्य, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव, सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

### चंद्रकांत पाटील विद्यापीठातून पुण्याला रवाना

या समारंभासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील हे विद्यापीठात आले. त्यांनी प्रमुख पाहुणे, कुलगुरू आणि व्यवस्थापन व विद्यापरिषदेच्या सदस्यांची भेट घेतली. तेथून ते दीक्षान्त मिरवणुकीत सहभागी झाले. पण अचानक भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश बापट यांचे निधन झाल्याचे वृत्त समजताच मंत्री पाटील तेथून पुण्याला रवाना झाले.

30 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकलव्य होऊन नवी कौशल्ये शिका

## डॉ. संजय धांडे; शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ उत्साहात

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : विद्यापीठीय शिक्षणानंतर आपण आता लाईफ लाँग लर्निंग या (थ्री-एल) युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश घेत आहात. इथे ना लेक्चर आहेत, ना परीक्षा आहेत. दररोजचा दिवस नवी कौशल्ये आत्मसात करायला लावणारा आहे. अशा नव्या युगातील डिजिटल एकलव्य होऊन नवी कौशल्ये आत्मसात करा आणि शिकण्याची प्रक्रिया निरंतर सुरू ठेवा, असा यशाचा बीजमंत्र भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) कानपूरचे माजी संचालक पद्मश्री डॉ. संजय धांडे यांनी आज येथे नवपदवीधरांना दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षान्त समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस ऑनलाईन पद्धतीने अध्यक्षस्थानी उपस्थित होते. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहातील समारंभात सावे (ता. सांगोला) येथील महेश बंडगर याला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर किल्लेमच्छिंद्रगड (ता. वाळवा) येथील सोहम जगताप याला कुलपती सुवर्णपदक डॉ. धांडे यांच्या हस्ते प्रदान केले. कोरोनानंतर दोन वर्षांनी केंद्रीय पद्धतीने दीक्षान्त समारंभ यंदा विद्यार्थी, पालकांच्या गर्दीत आणि उत्साही वातावरणात झाला.

यावर्षी एकूण ६६ हजार ४५६ स्नातकांना पदवी प्रदान केली. डॉ. धांडे म्हणाले, 'कोरोनानंतर जगातील

पान ११ वर >



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षान्त समारंभात बुधवारी आयआयटी कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या छायाचित्रात व्यासपीठावर (डावीकडून) प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.** (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

### विषयनिवडीचे स्वातंत्र्य विद्यापीठांनी द्यावे

■ डॉ. धांडे म्हणाले, "राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा कौशल्य आणि मूल्ये या दोन पैलूंवर मोठा भर आहे. या मूल्यांची बीजे रुजविण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे. बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम अवलंबित असताना विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयनिवडीचे स्वातंत्र्य विद्यापीठांनी द्यायला हवे."

### राजर्षी शाहूंचे स्मारक संग्रहालय उभारण्याचा निर्णय कौतुकास्पद

■ राज्यपाल रमेश बैस यांनी आई अंबाबाईच्या पावन भूमीला आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करीत भाषणास प्रारंभ केला. करवीरनगरी ही भारतातील लोकांसाठी दक्षिण काशी आहे. माता अंबाबाईचे हे पवित्र मंदिर भाविकांचे पवित्र निवासस्थान आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे हे राज्य पुरोगामी आणि कल्याणकारी कार्यांसाठी देशभर प्रसिद्ध आहे. विद्यापीठाने राजर्षी शाहूंचे स्मारक संग्रहालय उभारण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास्पद आहे. हे संग्रहालय सर्वांसाठी खुले असावे, असे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
30 MAR 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग सर्वसाधारण विजेता

## 'शिवस्पंदन' विद्यापीठस्तरीय स्पर्धा : आठ प्रकाराच्या स्पर्धेचा निकाल जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या 'शिवस्पंदन २०२२-२३' या विद्यापीठस्तरीय कला, सांस्कृतिक स्पर्धेमध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक पटकावला. या विद्यार्थ्यांना कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते चषक प्रदान करण्यात आला.

विद्यापीठ अधिविभागातील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कलागुणांना वाव देण्यासाठी शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ पासून विद्यापीठ स्तरीय 'शिवस्पंदन' या सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले. गट स्तरीय स्पर्धेत समूहनृत्य, लघुनाटिका, मूकनाटय, भारतीय समूहगीत, लोकवाद्य, नकला, सुगम गायन,




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'शिवस्पंदन २०२२-२३'मध्ये सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त करणाऱ्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या चमूस सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक प्रदान करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड आदी.

एकल नृत्य अशा आठ कला प्रकारांचा समावेश होता. या स्पर्धांमधून प्रथम व द्वितीय क्रमांक काढून, विद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी पात्र स्पर्धकांच्या स्पर्धा राजमाता जिजाऊसाहेब बहुद्देशिय सभागृह व वि. स. खांडेकर भाषा भवन येथे घेण्यात आल्या. यातून कला प्रकारनिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक काढले. सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या संगीत व नाटयशास्त्र अधिविभागास सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक देण्यात आला.

'शिवस्पंदन' कार्यक्रमासाठी विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नितिन कांबळे यांनी परिश्रम घेतले.

रसायनशास्त्र अधिविभागाचे डॉ. के. एम. गरडकर, भूगोल अधिविभागाच्या डॉ. एम. बी. पोतदार, नॅनो सायन्स अधिविभागाचे डॉ. प्रमोद कसबे, शिक्षणशास्त्र अधिविभागाचे डॉ. व्ही. एस. खंडागळे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे डॉ. के. व्ही. मारुलकर, समाजशास्त्र अधिविभागाचे डॉ. पी. एम. माने, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. पी. डी. पाटील, सहायक अधीक्षक एस. टी. आडके, वरिष्ठ सहाय्यक सुरेश मोरे यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAR 2023
तरुण भारत



विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्तीचा आनंद अशी उंच उडी मारून साजरा केला. (छाया : रियाज ट्रेनर)

# कोरोनानंतर विद्यापीठाच्या प्रांगणात आनंदोत्सव

- दीक्षांत समारंभास हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती
- पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी ४३ स्टॉलवर विद्यार्थ्यांची गर्दी

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनानंतर प्रथमच झालेल्या शिवाजी विद्यापीठातील दीक्षांत समारंभात विद्यापीठ परिसर गजबजून गेला. दीक्षांत समारंभ बुधवारी सकाळी ११.४५ वाजता सुरू झाला. पण विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांनी सकाळी ७ वाजल्यापासून मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. जल्लोषी वातावरणातील तरूणाईने विद्यापीठ परिसर फुलून गेला होता. पदवी स्विकारल्यानंतर छायाचित्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वरूढ पुतळ्यासह मुख्य इमारत आली पाहिजे हे कटाक्षाने पाहिले जात होते.

पदवीसाठीचे मानवस्त्र गळ्यात घालून दिवसभर विद्यार्थी विद्यापीठ परिसरात फिरत होते. फोटोसेशन आणि सेल्फी काढण्यात विद्यार्थी दंग होते. काही विद्यार्थी तर कोरोनानंतर पहिल्यांदाच भेटल्याने त्यांच्या चेहऱ्यावरच्या आनंदाचे डोही...आनंद तरंग.. अशा वातावरणाने विद्यापीठ परिसर भारून गेला होता. पदवी स्विकारल्यानंतर आणि दीक्षांत समारंभाचा मुख्य कार्यक्रम संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर गर्दी केली होती. तसेच आपल्या आवडीची पुस्तके अनेकांनी खरेदीही केली. विद्यापीठ परिसरात जणू विद्यार्थ्यांचा मेळाच भरला होता.

ज्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळणार होते त्यांचे पालक व मित्र-मैत्रिणींनीही सभागृहात हजेरी लावली होती. पदवीनंतर पुढे काय, असा प्रश्न विचारत पदवी मिळालेल्या अनेकांच्या डोळ्यांमध्ये उच्चशिक्षणाची स्वप्ने दाटली होती. उच्च पदवी, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकीय अधिकारी होण्याचा ध्येय अनेकांचे असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिल्या.

### कर्मचाऱ्यांनी दिली कामे वाटून

दीक्षांत समारंभाची वेगळी कामे जवळपास ३०० कर्मचाऱ्यांना कामे वाटून दिली होती. त्यामुळे पदवी प्रमाणपत्रांच्या स्टॉलवर सकाळपासून गर्दी नव्हती. पीएच. डी. व गुणवंत विद्यार्थी गळ्यात मानवस्त्र घालून विद्यापीठ परिसरात फिरत होते. या विद्यार्थ्यांना रांगेत उभा करणे, खुर्चा मांडण्यापासून ते स्टेजवरील बैठक व्यवस्थेपर्यंत सर्व कामे वाटून दिली होती.

### मला मिळालेल्या राष्ट्रपती सुवर्णपदकाने माझी जबाबदारी वाढली

मी ग्रामीण भागातील असलो तरी माझ्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मी अभ्यास केला. प्रत्येक स्पर्धेत सहभाग नोंदवला त्यामुळेच मला राष्ट्रपती सुवर्णपदक प्राप्त झाले. या सुवर्णपदकाने माझी आणखीन जबाबदारी वाढवली आहे.

महेश बंडगर (विद्यार्थी)

2

30 MAR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाने '२५ वर्षांची ब्ल्यू प्रिंट' जाहीर करावी

## राज्यपाल रमेश बैस यांचे विद्यापीठाला आवाहन : ५९ व्या दीक्षांत समारंभात ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान

प्रतिनिधी

कोल्हापूर

विद्यापीठ म्हणजे सर्वश्रेष्ठ ज्ञानाचे धन असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान विभागासह मानव्यशास्त्र विभागातील संशोधकांनी जागतिक पातळीवर आपली ओळख निर्माण केली आहे. नवीन शैक्षणिक धोरणात उद्योजकता आणि कौशल्याला प्राधान्य दिले आहे. नॅकचे ए++ मानांकन आणि एनआयआरएफ मानांकन मिळवून शिवाजी विद्यापीठाने आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यामुळे विद्यापीठाने "२५ वर्षांची ब्ल्यू प्रिंट" जाहीर करावी, असे आवाहन दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ राजमाता जिजाऊ सभागृहात मंगळवारी पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल रमेश बैस होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कानपूर आयआयटीचे माजी संचालक डॉ. संजय धांडे होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रपती सुवर्णपदकाने महेश बंडगर तर कुलपती सुवर्णपदकाने सोहम जगताप यांना गौरविण्यात आले. यांच्यासह ४० पीएच.डी. व विविध अधिविभागातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देवून कौतुक केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अहवाल वाचताना ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान केल्याचे सांगितले. नॅक मूल्यांकन, एनआयआर मानांकनासह विद्यापीठाच्या घोडदौड कशी वाढत गेली याचे सविस्तर विश्लेषण केले. दीक्षांत समारंभाचे लाईव्ह प्रक्षेपण सुरू असल्याने एक हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन हजेरी लावली.

राज्यपाल बैस म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा लाभलेल्या करवीर नगरीचा इतिहास जगभर माहित आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे कौतुक केले. विद्यापीठात शाहूंचे स्मारक संग्रहालय उभारण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो कौतुकास्पद असल्याचे सांगितले. शिक्षण आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना विविध शाखांचे शिक्षण एकाचवेळी घेता येणार आहे. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, मटेरियल सायन्स, ग्रीन केमेस्ट्री, प्रोसेस कंट्रोल, इंटरनेट ऑफ थिंग्ज, डेटा मायनिंग अशा अनेक अभ्यासक्रमांनी विद्यापीठाला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवले आहे. पश्चिम महाराष्ट्रात ऊस लागवडीचे क्षेत्र जास्त असल्याने त्यावर आधारीत उत्पादन प्रसिध्द आहेत. विद्यापीठाने गुळावर संशोधनाविषयी दाखलेली दक्षता वाखाणण्यासारखी आहे. पदवीदान समारंभात पारितोषीकप्राप्त ६४ विद्यार्थ्यांपैकी फक्त १५ विद्यार्थी व अन्य मुली आहेत. त्यामुळे विद्यार्थीनींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देवून महिला सक्षमीकरण वाढवले पाहिजे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, यांच्यासह व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद, अधिष्ठाता, अधिसभा सदस्य, विद्यार्थी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







कोल्हापूर : दीक्षांत समारंभापूर्वी दीक्षांत मिरवणुकीत ज्ञानदंड घेऊन जाताना परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव. सोबत सर्व अधिकार मंडळाचे सदस्य. दुसऱ्या छायाचित्रात प्रमुख पाहुणे पद्मश्री डॉ. संजय धांडे यांच्या हस्ते राष्ट्रपती सुवर्णपदक स्वीकारताना महेश बंडगर, कुलपती सुवर्णपदक स्वीकारताना सोहम जगताप. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव. (छाया : रियाज ट्रेनर)

### 'लाईफ लॉंग लर्नर'' विद्यापीठात प्रवेश घेतला

पदवीप्रमाणप्राप्त विद्यार्थ्यांनी 'लाईफ लॉंग लर्नर'' विद्यापीठात प्रवेश घेतला आहे. नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्याला अतिशय महत्व दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात केली पाहिजेत. 'लाईफ लॉंग लर्नर'' विद्यापीठात कोणतेही प्रमाणपत्र, लेक्चर, प्रॅक्टीकल नाही. अनुभवातून शिक्षण घ्यावयाचे आहे. गतिमान जगात नाविन्यपूर्ण कौशल्य आत्मसाथ करणें, हेच खरे शिक्षण आहे.

डॉ. संजय धांडे (कानपूर आयआयटीचे माजी संचालक)

3 0 MAR 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुटकोर्टमुळे कायद्याचा सक्षम विद्यार्थी घडण्यास मदत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विधी विभागाच्या वतीने आयोजित मुटकोर्ट कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. श्रीकृष्ण महाजन. सोबत प्राचार्य आर. नारायण, ॲड. गिरीश खडके, निवृत्त न्यायाधीश सुनील कोतवाल, डॉ. विवेक धुपदाळे, राजेंद्र पाटील आदी.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कायद्याची पदवी घेतल्यानंतर लवकरात लवकर सक्षम होण्यासाठी मुटकोर्ट स्पर्धा उपक्रमात सहभाग घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून कोर्टात युक्तिवाद कसा करावा प्रत्यक्ष अनुभव मुटकोर्टद्वारे विद्यार्थ्यांना मिळत असल्यामुळे सक्षम विद्यार्थी तयार होण्यास मोलाची मदत मिळते, असे प्रतिपादन डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले

शिवाजी विद्यापीठ विधी विभागाच्या वतीने मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. महाजन यांनी मार्गदर्शन केले.मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश सुनील कोतवाल यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

विद्यापीठ विधी विभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागाअंतर्गत कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कोर्टात कसा युक्तीवाद करावा याचा प्रत्यक्ष अनुभव मिळणे महत्त्वाचे असते. यासाठी विधी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश सुनील कोतवाल म्हणाले, विधी पदवीधर व युवा वकिलांनी आयुष्यात यशस्वी वकील व्हायचे असल्यास केवळ कायद्याचे ज्ञान घेऊन उपयोग नाही. त्यांनी सभोवतालच्या घडामोडींकडे लक्ष ठेवून चौफेर ज्ञान मिळवणे गरजेचे आहे. निवृत्त न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी यांनी दुसऱ्या सत्रात वकिलांची कर्तव्य न्यायालयीन अधिकार विधी शिक्षणानंतरच्या संधी न्यायाधीश परीक्षेसाठी कशाप्रकारे अभ्यास

- डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात मुट कोर्ट स्पर्धा उत्साहात

करावा या विषयी सविस्तर माहिती दिली. बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे उपाध्यक्ष ॲड. विवेक घाटगे यांनी स्पर्धेमधील सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून यशस्वी होण्यासाठी कार्य आणि जबाबदारी याची सविस्तर माहिती सांगितली. यावेळी जिल्हा बार असोसिएशन अध्यक्ष ॲड. गिरीश खडके, शहाजी लॉ कॉलेजचे निवृत्त प्राचार्य आर नारायण, सूर्यकांत मिरजे, प्राध्यापक राजशेखर मलुष्टे, राजेंद्र पाटील यांच्यासह विधी विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी राज्यभरातील विविध महाविद्यालयांचा समावेश होता.

या स्पर्धेत एल. एल. एम. प्रथम वर्षातील जी. आर. कारे लॉ महाविद्यालय गोवा, बेस्ट मुटर हर्शल देसाई, एल. एल. एम. द्वितीय वर्षातील लॉ विभागात शिवाजी विद्यापीठाचा नंबर आला. बेस्ट मुटर राम गोपलानी, मध्यस्थी रोल प्ले मध्य एल. एल. एम. द्वितीय वर्ष शिवाजी विद्यापीठ विधी विभागाचा क्रमांक आला. या कार्यक्रमाचे संयोजन माधवी माळगे, प्रमोद दाभाडे यांनी केले. सूत्रसंचालन मानसी क्षीरसागर यानी केले. कार्यक्रमास चंद्रकांत कुरणे, ऋता निंबाळकर, हेमा जाधव, तेजस्विनी कास।े औदुंबर बनसोडे, देवदास चौगुले, राम गोपलाने, नागेश दरेकर आदी उपस्थित होते.

Times of India

# SUK STUDENTS FLYING HIGH

Rahul Gayakwa



The 59th Convocation of Shivaji University, Kolhapur was held on Wednesday with great enthusiasm among students. Ex-director of IIT-Kanpur, Padma Shri awardee Sanjay Dhande was the chief guest. Over 15,000 students attended the event, telecast on the university's 'Shiva-varta' YouTube channel